सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३

# बरो नगरपालिका (इमारती व जमिनी यांवरील विवक्षित कर वैध ठरविणे) अधिनियम, १९६५

(दिनांक १३ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारित)

MAHARASHTRA ACT No. III OF 1966

# The Borough Municipalities (Validation of Certain Taxes on Building and Lands) Act, 1965

(As modified upto 13th November 2006)

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[ किंमत : ४.८० रुपये ]

S (H) 728

# [ बरो नगरपालिका (इमारती व जमिनी यांवरील विवक्षित कर वैध ठरविणे) अधिनियम, १९६५ ]

**( दिनांक १३ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारित )**

## अनुक्रमणिका


उद्देशिका

| कलमे | | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव | ... | २ |
| २. | व्याख्या | ... | २ |
| ३. | सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८ याची कलमे ३ व ७५ यांची सुधारणा. | | ३ |
| ४. | विवक्षित बरो नगरपालिकांनी, गिरण्या, कारखाने आणि तत्संबंधित इमारती व जमिनी यांच्या बाबतीत आणि निरध्यर्थित जमिनींच्या बाबतीत कर बसविणे व ते वसूल करणे या गोष्टीचे वैधकरण. | | ३ |
| ५. | अशा करांबद्दल येणे असलेल्या रकमा संबंधित नगरपालिका प्राधिकारी संस्थेस देणे व तिने त्या वसूल करणे. | | ४ |
| ६. | व्यावृत्ती | ... | ५ |
| | अनुसूची | ... | ६ |

# सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३

## [ बरो नगरपालिका (इमारतीं व जमिनी यांवरील विवक्षित कर वैध ठरविणे) अधिनियम, १९६५ ][1]

(दिनांक १८ फेब्रुवारी, १९६६)

**विवक्षित बरो नगरपालिकांनी इमारतींवर व जमिनींवर जे कर बसविले व वसूल केले आहेत ते कर बसविणे व वसूल करणे आणि त्यांच्याशी संबंधित असलेल्या बाबी, वैध ठरविण्याबाबत अधिनियम.**

१९२५ चा मुंबई १८. **ज्याअर्थी,** मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ या अन्वये घटित करण्यात आलेल्या बरो नगरपालिकांना त्यांच्या क्षेत्राधिकारातील इमारतींवर व जमिनींवर पट्टी बसविण्याचा आणि इमारतींवर व जमिनींवर आकारलेल्या पट्टीच्या स्वरूपातील किंवा इतर कोणत्याही स्वरूपातील पाणीपट्टी बसविण्याचा अधिकार दिलेला आहे;

**आणि ज्याअर्थी,** विवक्षित बरो नगरपालिकांनी विवक्षित काळात, गिरण्या, कारखाने आणि तत्संबंधित इमारती व जमिनी यांच्या बाबतीत त्यांच्या जमिनींच्या क्षेत्रफळांवरील एकसारख्या दराचे आधारावर, वार्षिक भाडेमूल्याची मोजणी करून व निरध्यर्थित जमिनींच्या बाबतीत, त्यांच्या भांडवलीमूल्याच्या एका विवक्षित टक्केवारीने पट्टी ठरवून उपरोक्त कर बसविला असल्याचे अभिप्रेत आहे व तो त्यांनी वसूल केलेला आहे;

**आणि ज्याअर्थी,** लोकमान्य मिल्स विरूद्ध बार्शी बरो नगरपालिका (सन १९५७ चे दिवाणी अपील क्रमांक १२५ ते १२९) या प्रकरणात, दिनांक १४ मार्च १९६१ रोजी, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयात गिरण्या, कारखाने आणि तत्संबंधित इमारती व जमिनी यांच्या बाबतीत त्यांच्या जमिनीच्या क्षेत्रफळाच्या आधारावर वार्षिक भाडेमूल्याची मोजणी करण्यासाठी, बार्शी बरो नगरपालिकेने केलेले संबंधित नियम हे सदरहू अधिनियमान्वये आवश्यक असल्याप्रमाणे मूल्य निर्धारणाची पद्धती उक्त नियमात विहित केलेली नाही या कारणावरून, उक्त अधिनियमाच्या अधिकाराबाहेरचे आहेत असे ठरविले आहे;

**आणि ज्याअर्थी,** राज्यातील इतर काही बरो नगरपालिकांनी तत्सम नियम केलेले आहेत व त्यांची अंमलबजावणी केलेली आहे आणि त्यानुसार बसविण्यात आल्याचे अभिप्रेत असलेले कर वसूल करण्यात आलेले आहेत;

**आणि ज्याअर्थी,** गोवर्धनदास विरूद्ध नगरपालिका आयुक्त, अहमदाबाद (सन १९५६ चे दिवाणी अपील क्रमांक २५३) या प्रकरणात दिनांक २८ मार्च १९६३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयात, भांडवलीमूल्याच्या शेकडा प्रमाणाच्या आधारावर, निरध्यर्थित जमिनीचे मूल्य निर्धारण करण्यासाठी, भूतपूर्व अहमदाबाद बरो नगरपालिकेने केलेले नियम हे, सदरहू अधिनियमान्वये आवश्यक असल्याप्रमाणे, मूल्य निर्धारणाची पद्धती उक्त नियमात विहित केलेली नाही व उक्त

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-५, अतिरिक्त, पृष्ठ ७७६ पहा.

अधिनियमाच्या कलम ७३, पोट-कलम (१), खंड (एक) मध्ये "पट्टी" हा शब्द वापरण्यात आला असल्यामुळे, असा कर हा, प्रत्यक्ष भांडवलीमूल्याच्या आधारावर न बसविता तो वार्षिक मूल्याच्या आधारावर बसविणे आवश्यक होते या कारणावरून ते उक्त अधिनियमाच्या अधिकाराबाहेरचे आहेत असे ठरविले आहे;

**आणि ज्याअर्थी,** राज्यातील विवक्षित बरो नगरपालिकांनी जमिनींच्या संबंधात तत्सम नियम केलेले आहेत व त्यांची अंमलबजावणी केलेली आहे आणि त्यानुसार बसविण्यात आल्याचे अभिप्रेत असलेले कर, वसूल करण्यात आले आहेत;

**आणि ज्याअर्थी,** राज्यातील बरो नगरपालिकांनी असे सर्व कर बसविणे व ते वसूल करणे हे वैध ठरविण्यासाठी व अशा करांची वसुली करण्याकरिता व उपरोक्त बाबींशी संबंधित असलेल्या प्रयोजनाकरिता तरतूद करणे आवश्यक आहे;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सोळाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास बरो नगरपालिका (इमारती व जमिनी यांवरील विवक्षित कर वैध ठरविणे) अधिनियम, १९६५ असे म्हणावे.

व्याख्या. **२.** संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, या अधिनियमात,--

(क) "बरो अधिनियम" म्हणजे मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५; १९२५ चा मुंबई १८.

(ख) "बरो नगरपालिका" म्हणजे, बरो अधिनियमान्वये रचना करण्यात आलेली व ह्या अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली नगरपालिका;

(ग) "मुख्य अधिकारी" या संज्ञेचा अर्थ, एखाद्या बरो नगरपालिकेचा मुख्य अधिकारी असा समजावा आणि तीत, मुख्य अधिकारी, ह्याबाबतीत त्या नगरपालिकेच्या ज्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याकडे आपले अधिकार सोपविल अशा अधिकाऱ्याचा समावेश होतो ; आणि सोलापूर बरो नगरपालिकेच्या बाबतीत, या संज्ञेचा अर्थ, सोलापूर शहराच्या उत्तराधिकारी महानगरपालिकेचा, नगरपालिका आयुक्त, असा समजावा, आणि तीत, आयुक्त, ह्या बाबतीत, त्या महानगरपालिकेच्या ज्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याकडे, आपले अधिकार सोपवील अशा अधिकाऱ्याचा समावेश होतो;

(घ) "घरपट्टी" म्हणजे, एखाद्या बरो नगरपालिकेस, बरो अधिनियमाच्या कलम ७३, पोट-कलम (१), खंड (एक) अन्वये इमारती व जमिनी यांवर जो कर बसविण्याचा अधिकार दिला होता किंवा दिला आहे असा कर–मग त्यास कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो;

(ङ) "प्रांतिक महानगरपालिका अधिनियम" म्हणजे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९; १९४९ चा मुंबई ५९.

(च) ''पाणीपट्टी'' म्हणजे, एखाद्या बरो नगरपालिकेस, बरो अधिनियमाच्या, कलम ७३, पोट-कलम (१), खंड (दहा) अन्वये, इमारतींवर आणि जमिनींवर आकारलेल्या कराच्या रूपाने, जो कर बसविण्याचा अधिकार दिला होता किंवा दिला आहे असा पाण्यावरील कर—मग त्यास कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो.

**३.** बरो अधिनियमात,--

(क) कलम ३ मध्ये, खंड (१७) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल, व तो नेहमीच समाविष्ट करण्यात आला असल्याचे समजण्यात येईल :--

''(१७-अ) 'इमारती किंवा जमिनी यांवरील कर' यामध्ये, इमारतींवर किंवा जमिनींवर लादलेल्या कोणत्याही कराचा समावेश होतो;'';

(ख) खंड ७५ मध्ये, शेवटच्या स्पष्टीकरणाऐवजी पुढील स्पष्टीकरण दाखल करण्यात येईल व ते नेहमीच दाखल करण्यात आले असल्याचे समजण्यात येईल :--

सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८ याची कलमे ३ व ७५ यांची सुधारणा.

"**स्पष्टीकरण.--**इमारती किंवा जमिनी यांवरील कराच्या प्रयोजनांसाठी पुढील आधारावर मूल्यनिर्धारण करण्यात येईल :--

(एक) वार्षिक भाडेमूल्य;

(दोन) वार्षिक मूल्य;

(तीन) गिरण्या, कारखाने आणि त्यांच्याशी संबंधित अशा इमारती व जमिनी यांच्या बाबतीत, जमिनीचे क्षेत्रफळ;

(चार) निरध्यर्थित जमिनीच्या बाबतीत भांडवलीमूल्य.''.

विवक्षित बरो नगरपालिकांनी, गिरण्या, कारखाने आणि तत्संबंधित इमारती व जमिनी यांच्या बाबतीत आणि निरध्यर्थित जमिनींच्या बाबतीत कर बसविणे व ते वसूल करणे या गोष्टीचे वैधकरण.

**४.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही वेळी बरो अधिनियमान्वये व तदन्वये केलेल्या नियमान्वये कोणत्याही गिरण्या, कारखाने आणि तत्संबंधित इमारती व जमिनी यांच्याबाबतीत, किंवा कोणत्याही निरध्यर्थित जमिनींच्या बाबतीत बसविण्यात आलेली किंवा बसविण्यात आल्याचे अभिप्रेत असलेली व वसूल करण्यात आलेली कोणतीही घरपट्टी किंवा कोणतीही पाणीपट्टी ही या अधिनियमान्वये दुरुस्त केलेल्या बरो अधिनियमान्वये किंवा तदनुसार बसविण्यात व वसूल करण्यात आली आहे असे समजण्यात येईल, आणि तदनुसार कोणत्याही न्यायालयाचे कोणतेही निकालपत्र, हुकूमनामा किंवा आदेश यात काहीही असले तरी, बसविण्यात व वसूल करण्यात आलेली अशी कोणतीही घरपट्टी किंवा पाणीपट्टी ही, सर्व प्रयोजनांसाठी, वैधरीत्या बसविण्यात व वसूल करण्यात आल्याचे आणि नेहमीच वैधरीत्या बसविण्यात व वसूल करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल आणि अशी पट्टी, वार्षिक भाडेमूल्याच्या आधारावर बसविण्यात आली नव्हती, किंवा जमिनीच्या क्षेत्रफळावरील एक सारख्या दराच्या आधारावर बसविण्यात आली होती किंवा ती भांडवलीमूल्याच्या किंवा अशा मूल्यावरील शेकडा प्रमाणाच्या आधारावर बसविण्यात आली होती याच केवळ मुद्द्यावरून किंवा बरो अधिनियमात किंवा नियमात घालून दिलेली कोणतीही कार्यपद्धती अनुसरण्यात आली नव्हती याच केवळ मुद्द्यावरून तिजविरुद्ध हरकत घेता येणार नाही.

(२) बरो अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमान्वये काम करणाऱ्या किंवा काम करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही बरो नगरपालिकेने किंवा तिच्यावतीने किंवा अशा नगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने, उक्त कर बसविण्यासाठी किंवा वसूल करण्यासाठी किंवा बसविण्याच्या किंवा वसूल करण्याच्या संबंधात केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही ही सर्व प्रयोजनांसाठी, वैधरीत्या करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल, आणि पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही किंवा सर्व मुद्द्यांवर कोणत्याही न्यायालयात कोणत्याही प्रकारचा कोणताही दावा किंवा इतर वैध कार्यवाही दाखल करून घेता येणार नाही किंवा चालू ठेवता येणार नाही.

अशा करांबद्दल येणे असलेल्या रकमा संबंधित नगरपालिका प्राधिकारी संस्थेस देणे व तिने त्या वसूल करणे.

५. (१) बरो अधिनियम, प्रांतिक महानगरपालिका अधिनियम किंवा मुदतीबाबत अधिनियम, १९६३ यात किंवा न्यायालयाचे कोणतेही निकालपत्र, हुकूमनामा किंवा आदेश यात काहीही असले तरी, जर बसविण्यात आलेल्या किंवा बसविल्याचे अभिप्रेत असलेल्या, निकटपूर्वीच्या कलमात उल्लेख केलेल्या कोणत्याही कराबद्दलची कोणतीही रक्कम बरो नगरपालिकेस किंवा, यथास्थिती, उत्तराधिकारी महानगरपालिकेस (जिचा यापुढे या कलमात "स्थानिक प्राधिकारी संस्था" असा उल्लेख करण्यात आला आहे) देण्यांत आली नसेल तर, असा कर, संबंधित स्थानिक प्राधिकारी संस्थेस, त्याबद्दलची मागणी करण्यात आल्यापासून तीन दिवसांच्या आत, यापुढे या कलमात तरतूद केल्याप्रमाणे, देण्याजोगी असेल :

सन १९६३ चा ३६.

परंतु, अशी मागणी करण्यात आल्यावर, कर देण्याची कोणत्याही व्यक्तीची जबाबदारी,--

(क) जेव्हा स्थानिक प्राधिकारी संस्थेने या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, वार्षिक भाडेमूल्याच्या आधाराव्यतिरिक्त, या अधिनियमान्वये दुरुस्त केलेल्या बरो अधिनियमाच्या कलम ७५ मधील स्पष्टीकरणात उल्लेख केलेल्या इतर कोणत्याही आधारावर असा कर बसविण्याचे बंद केले असेल तेव्हा—अशा बंद करण्याच्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या सहा वर्षांपूर्वीच्या कोणत्याही कालावधीस,

(ख) इतर बाबतीत, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या सहा वर्षांपूर्वीच्या कोणत्याही कालावधीस,

लागू होणार नाही.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर शक्य होईल तितक्या लवकर, परंतु, तो अंमलात आल्यापासून तीन वर्षे समाप्त होण्यापूर्वी, संबंधित स्थानिक प्राधिकारी संस्थेच्या मुख्य अधिकाऱ्याने असा कोणताही कर देण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीस, त्याच्याकडून येणे असलेल्या रकमेबद्दल बिल देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(३) मुख्य अधिकाऱ्यास, तो ठरविल अशा एका किंवा अनेक नमुन्यात, कर देण्यास जबाबदार असलेल्या व्यक्तीकडून येणे असलेल्या सर्व करांबद्दलचे एकत्रित बिल तयार करता येईल व ते देता येईल, किंवा त्यास निरनिराळ्या करांच्या बाबतीत किंवा निरनिराळ्या कालावधीकरिता किंवा निरनिराळ्या मालमत्तांकरिता वेगवेगळी बिले तयार करता येतील. तथापि, अशा प्रत्येक बिलात,

ज्या कालावधीबद्दल तो कर घेणे असेल तो कालावधी किंवा ते कालावधी, ज्या मालमत्तेच्या किंवा सेवेच्या बाबतीत तो कर देण्याजोगा असेल ती मालमत्ता किंवा ती सेवा, त्यावर किंवा त्यांच्या बाबतीत आकारलेल्या कराची रक्कम, पूर्वीच कोणतीही रक्कम देण्यात आली असल्यास ती रक्कम, आणि येणे असलेली बाकी रक्कम आणि लगेच नंतरच्या पोट-कलमात तरतूद केल्याप्रमाणे ज्या मुदतीत अपील दाखल करता येईल ती मुदतसुद्धा निर्दिष्ट करण्यात येईल.

(४) (क) पोट-कलम (१) अन्वये केलेल्या कोणत्याही मागणीच्या बाबतीत, करांबद्दलचे बिल देण्यात आल्यापासून तीस दिवसांच्या आत, अशा प्रकारच्या प्रकरणांची न्याय्य चौकशी, सत्र न्यायाधीशांच्या निदेशांनुसार, ज्यांच्याकडून करावयाची असेल अशा दंडाधिकाऱ्याकडे किंवा दंडाधिकाऱ्यांच्या न्यायमंडळाकडे पुढीलपैकी कोणत्याही एका किंवा अनेक मुद्द्यांवर अपील करता येईल,--

(एक) अपील करणारी व्यक्ती ही, प्रस्तुत मालमत्तेच्या किंवा सेवेच्या बाबतीत कर देण्यास जबाबदार असलेली व्यक्ती नाही कारण ती कराच्या कोणत्याही कालावधीत त्या मालमत्तेची मालकही नव्हती किंवा भोगवटा करणारीही नव्हती;

(दोन) त्या मालमत्तेस कराची माफी देण्यात आलेली आहे;

(तीन) स्वीकारण्यात आलेले जमिनीचे क्षेत्रफळ, किंवा ठरविण्यात आलेले भांडवलीमूल्य, किंवा कराची रक्कम, बरोबर नाही.

(ख) निकटपूर्वीच्या खंडान्वये केलेल्या कोणत्याही अपिलात, दंडाधिकाऱ्याने किंवा दंडाधिकाऱ्यांच्या न्यायमंडळाने दिलेला निर्णय, कोणत्याही एका पक्षकाराने अशा निर्णयाच्या दिनांकापासून तीन दिवसांच्या आत अर्ज केला असता, अशा दंडाधिकाऱ्यांच्या किंवा न्यायमंडळाच्या निर्णयाविरुद्ध सामान्यतः ज्या न्यायालयाकडे अपिले करता येतात त्या न्यायालयाच्या फेरतपासणीच्या अधीन असेल.

(५) या कलमात अन्यथा जी तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, बरो अधिनियमाचे आणि सोलापूर बरो नगरपालिकेच्या बाबतीत, प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी आणि संबंधित अधिनियमान्वये केलेले किंवा केल्याचे समजण्यात येत असलेले आणि त्या त्या वेळी अंमलात असलेले नियम व आदेश हे, योग्य त्या फेरफारांसह, या कलमान्वये कोणतीही बिले देण्याच्या व मागणी केलेल्या कोणत्याही रकमेच्या वसुलीच्या बाबतीत आणि केलेल्या कोणत्याही अपिलाच्या किंवा फेरतपासणी अर्जाच्या बाबतीत लागू होतील.

६. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, कोणत्याही व्यक्तीने केलेल्या कोणत्याही कृत्याच्या किंवा करावयाचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टींच्या बाबतीतील कोणत्याही अपराधाबद्दल, जर असे कृत्य किंवा वर्जन या अधिनियमाच्या तरतुदींच्या अभावी अपराध ठरत नसेल तर, अशी व्यक्ती दोषी ठरविली जाण्यास पात्र असणार नाही. व्यावृत्ती.

## अनुसूची

[ कलम २, खंड (ख) पहा. ]

१. अमळनेर बरो नगरपालिका.

२. बार्शी बरो नगरपालिका.

३. भुसावळ बरो नगरपालिका.

४. चाळीसगाव बरो नगरपालिका.

५. जळगाव बरो नगरपालिका.

६. कऱ्हाड बरो नगरपालिका.

७. दिनांक १ मे, १९६४ पूर्वी घटित करण्यात आल्याप्रमाणे सोलापूर बरो नगरपालिका.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६